**महागांव ल.पा.यो. ता. दारव्हा, जि. यवतमाळ योजनेस तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक : १२६ /विपाविम/कातां ३(१)/(धा.क्र. २१/२०२२)/ महागांव ल.पा.यो / तृतीय सुप्रमा/ २०२३, दि.१४ /०७/२०२३**

**संदर्भ :-** १. महामंडळाचा व्दितीय सुप्रमा आदेश क्र. १०४/विपाविम/कातां-३(१)/(धा.क्र. १०२/२००९)/ महागांव लपायो/ २०१८ दि.२०/०४/२०१८

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.

३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र क्र.रातासंस (१)/ महागांव लपायो / (धा.क्र.९४/२०२२)/ २०२ /२०२३ दि.०१/०३/२०२३

४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.०२/०६/२०२३ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०२३/(३७/२०२३)/लपा, दि. १३/०६/२०२३.

५. विपाविम नियामक मंडळाचे दि. १९/०६/२०२३ चे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र. ८३/४२

**प्रस्तावना** :

महागांव ल. पा. योजना, या महामंडळांतर्गत गोदावरी खो-यातील अरुणावती उपखोऱ्यात मौजे महागांव ता. दारव्हा जि. यवतमाळ या गावजवळून वाहणाऱ्या स्थानिक नाल्यावर (गावाच्या वरच्या बाजुस बांधण्यात येत आहे. सदर योजनेमुळे यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा तालुक्यातील महागांव, देऊरवाडी व आर्णी तालुक्यातील गणगांव, लेणी अशा एकुण ४ गावांतील PDN द्वारे ६५१ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

महागांव ल.पा. योजनेस शासन निर्णय क्र.लपात-२२०६/(५४६/२००६) /लपा-२ दि.२१.१२.२००६. नुसार सन २००५-०६ चे दरसुचीवर आधारीत रू.१४.६८ कोटी (रू. चवदा कोटी अडुसस्ट लक्ष) इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानंतर या योजनेस महामंडळ निर्णय क्र. विपाविम/कातां-७/६४४/महागांव/सुप्रमा/(१०२/०९) दि.१४/०८/२००९ नुसार सन २००८-०९ च्या दरसुचीवर आधारित रु. २०.५१ कोटी (रू. विस कोटी एकवन्न लक्ष फक्त ) इतक्या रकमेस नव्याने प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तद्नंतर प्रकल्पाच्या किंमतीत विविध बाबींमध्ये पुन्हा वाढ झाल्यामुळे प्रकल्पास महामंडळाचे व्दितीय सुप्रमा आदेश क्र. १०४/विपाविम/कातां-३(१)/(धा.क्र. १०२/२००९))/ महागांव लपायो/ २०१८ दि.२०/०४/२०१८ नुसार सन २०१६-१७ च्या दरसुचीवर आधारित रु. ८१.३९ कोटी (रू. एक्यांशी कोटी एकोणचाळीस लक्ष फक्त ) इतक्या रकमेस द्वितीय प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली आहे.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदल यामुळे वाढ, भाववाढ, भुसंपादन खर्चातील वाढ, संकल्पचित्रातील बदलामुळे वाढ, नविन कामामुळे वाढ, अपु-या

तरतुदीमुळे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत द्वितीय प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

महागांव ल. पा. योजना तृतीय सुप्रमा बाबतचा छाननी अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती (१), नाशिक, यांचे दि. ०८/०२/२०२३ रोजीच्या १८६ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार प्राप्त झालेला आहे.

महागांव ल. पा. योजनेच्या तृतीय सुप्रमा प्रस्तावावर अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.०२/०६/२०२३ रोजी झालेल्या मा. सचिव स्तरावरील उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १९/०६/२०२३ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र.८३/४२ नुसार महागांव ल. पा. योजनेच्या रू. १०१.७६ कोटी किंमतीच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासनी अहवालातील मुद्दा क्र. २६ व २७ ची पुर्तता करण्याच्या अटीचे अधीन राहुन, तसेच मा.सचिव स्तरावरील उपसमितीच्या दि. ०२/०६/२०२३ च्या बैठकीमध्ये उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अटीचे अधीन राहून मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करणेकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाच्या द्वितिय सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रू. ८१.३९ कोटी च्या तुलनेत तृतीय सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रू. २०.३७ कोटी ने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेतः-

| अ. क्र. | बाब | वाढ रू. कोटी | मंजुर व्दितीय सुप्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी | एकूण वाढीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | दरसुचीतील बदल व भाववाढ | ५.२१ | ६.४० | २५.५८ |
| २ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | ४.४८ | ५.५० | २१.९९ |
| ३ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | ४.४४ | ५.४६ | २१.८० |
| ४ | नविन कामामुळे झालेली वाढ | ०.१३ | ०.१६ | ०.६४ |
| ५ | अपुऱ्या तरतुदीमुळे झालेली वाढ | ४.३६ | ५.३६ | २१.४० |
| ६ | अनुषंगीक खर्च वाढ | १.७५ | २.१५ | ८.९५ |
| | **एकूण** | **२०.३७** | **२५.०३** | **१००** |